स्थायी समिती
दाखल विषय – दि. १३/७/२०२१

विषय क्रमांक :– ५०८ त्वर्य

प्रभाग क्र. ३२ अ (जुना ३१) वारजे स.नं. ३५/२ येथे मॅटर्निटी होम हॉस्पिटलचे उर्वरीत आर.सी.सी. व स्थापत्य विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.तेजदर्शन इन्फ्रा प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,२२,०२,३६३=५० पेक्षा ०.१५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,२१,८४,०५९=९५ पर्यंत कामे करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १४,६४,२८३=६२ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रु. ६४,८७२/– अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २,६४,०५०=८९ पर्यंत अधिक अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/३२२ दि.७/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५०९ त्वर्य

आरोग्य विभागांतर्गत अवैद्यकीय प्रशासक (वर्ग-२) पदाची सेवांना मुदतवाढ देणेबाबत खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३२३ दि.७/७/२०२१ चे पत्र.

१. ३ महिने कालावधीकरिता प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या **१ अवैद्यकीय प्रशासकाला दि. १०/०७/२०२१ रोजी नंतर** एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ६ महिन्यांच्या कालावधीकरिता मुदत वाढ देणेस.
२. सदर कालावधीमध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी झाल्यास व खात्यास या पदाची गरज न भासल्यास सदर सेवकाची सेवा संपुष्टात आणणेस.
३. संबंधित सेवकाकडून नव्याने करारनामे करून घेणेस.
४. आज्ञापत्रक आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने निर्गमित करणेस.

विषय क्रमांक :– ५१० त्वर्य

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधीकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोलाईन प्रकल्पाच्या मार्गिकेमधील सावित्रीबाई फुले विद्यापीठ चौकामध्ये प्रस्तावित असलेल्या नवीन एकात्मिक दुमजली उड्डाणपूल, भुयारी मार्ग व इतर उपाययोजनांचे बांधकाम करण्याच्या सुधारित संरचनेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्रकल्प)/३२५ दि.८/७/२०२१ चे पत्र.

(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधीकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोलाईन प्रकल्पाच्या मार्गिकेमधील सावित्रीबाई फुले विद्यापीठ चौकामध्ये प्रस्तावित असलेल्या नवीन एकात्मिक दुमजली उड्डाणपूल, भुयारी मार्ग व इतर उपाययोजनांचे बांधकाम करण्याच्या सुधारित संरचनेस.

(२) मा. मुख्य सभा ठराव क्र.२२८ दिनांक १७/०२/२०२१ अन्वयेच्या मान्यतेनुसार हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाईन - ३ या मार्गिकेवरील सावित्रीबाई फुले विद्यापीठ चौकामध्ये बांधण्यात येणाऱ्या मेट्रो पूलाच्या कामासमवेत उड्डाणपूलाचे काम करणेस व त्याचा संपूर्ण खर्च पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करणेस.

(३) शिवाजीनगरकडून औंधकडे जाणेसाठी अंडरपास करणे (रू.६८ कोटी ), सेनापती बापट रोडवरून बाणेर व पाषाणकडे जाणेसाठी उड्डाणपूलास २ लेन रॅम्पद्वारे कनेक्शन करणे ( रू.२५ कोटी) हरेकृष्ण मंदिर येथे २ +२ लेन ग्रेड सेपरेटर करणे ( रू.१५ कोटी ) सिमला ऑफिस चौक येथे दोन लेन ग्रेड सेपरेटर करणे (रू.१० कोटी), व अभिमानश्री चौकामध्ये ग्रेडसेपरेटर करणे ( रू.४० कोटी ) ही कामे वाहतुकीचा विचार करून आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने पुणे महानगरपालिकेमार्फत करणेस.

विषय क्रमांक :– ५११ त्वर्य

मा.महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/७५१ दि १७/०३/२०२१ अन्वयेचे ठरावानवये COEP जंबो कोविड हॉस्पिटलचे कामकाजाची पुनश्च सुरूवात पुढील तीन महिन्याचे कालावधीकरिता दि.२२/०३/२०२१ रोजी करण्यात आली होती. त्यानुसार COEP जंबो कोविड हॉस्पिटलचे कामकाजाची मुदत दि.२१/०६/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

तथापी आज दि.२१/०६/२०२१ रोजी COEP जंबो कोविड हॉस्पिटलमध्ये एकूण ३३ रूग्ण असून त्यापैकी ऑक्सिजन बेडवर २, आय.सी.यू बेडवर १६ व एच.डी.यु. बेडवर १५ रूग्ण आहेत. सदर रूग्णांची तपासणी मे.मेडब्रोज हेल्थकेअर प्रा.लि. यांचेमार्फत करण्यात येत असून आय.सी.यू व एच.डी.यू. मधील रूग्ण इतरत्र स्थानांतरीत करणे वैद्यकीय दृष्ट्या जोखमीचे असल्याने या रूग्णांची प्रकृती सुधारेपर्यंत या रूगणांवर पुढील उपचार करणेस्तव COEP जंबो कोविड हॉस्पिटलचे कामकाजास संदर्भांकित मान्यतेमधील अटी व शर्ती कायम ठेवून दि.३०/०६/२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेस अथवा COEP जंबो कोविड हॉस्पिटलमधील (सर्व रूग्णांना) शेवटचा रूग्ण डिस्चार्ज करेपर्यंत मुदतवाढ देणेस तसेच दि. २१/०६/२०२१ नंतरचे देयकाकरिता प्रत्यक्ष उपस्थित प्रती रूग्ण प्रमाणे संस्थाचे देयक आदा करण्यास (दि.३०/०६/२०२१ पर्यंत मुदतवाढ अथवा शेवटचा रूग्ण डिस्चार्ज होई पर्यंत यापैकी जे नंतर घडेल त्यास) व मे.दिपाली डीझाईन्स अँण्ड एक्सीबिट्स यांना प्रती माह प्रमाणे देयक आदा करणेस मा.मुख्य सभा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) (क) अन्वये मान्यता देईल या भरवश्यावर मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३)(क) अन्वये मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/सीओईपी/३२७ दि.९/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१२ त्वर्य

पुणे शहरात सध्या कोव्हिड –१९ आजाराचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर दिसून येत आहे.याअनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या कोविड केअर हॉस्पिटलमध्ये दाखल होणा–या कोव्हिड रूग्णांची संख्या मोठया प्रमाणावर आढळून येत आहे.कोविड झालेल्या रूग्णांना कोविड पश्चात म्युकरमायकोसिस या बुरशीपासून झालेल्या आजाराने ग्रासलेल्या रूग्णांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे.म्युकरमायकोसिस आजारावर उपचार करताना एम्फोटेरिसिन बी इंजेक्शन व पोसॅकोनाझोल १०० एमजी टॅबलेटची रूग्णांना मोठया प्रमाणावर आवश्यकता भासत आहे. एका रूग्णाला ५० ते १०० इतके इंजेक्शन व २८ ते ३० टॅबलेटची आवश्यकता असू शकते. पुणे महानगरपालिकेमार्फत डॉ.दळवी रूग्णालय येथे म्युकरमायकोसिस आजारावर उपचार केंद्र सुरू करण्यात येणार आहे. सदर ठिकाणी वरील औषधे व इंजेक्शन रूग्णांना मोफत उपलब्ध करून देणे हे क्रमप्राप्त आहे.

मा. जिल्हाधिकारी पुणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे यांनी वेळोवेळी नेमुन देण्यात येणा–या किरकोळ व्यापारी /घाउक व्यापारी यांच्याकडून व तसेच पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला वरील इंजेक्शन व टॅबलेटस् उपलब्ध करून देण्या–या किरकोळ व्यापारी /घाउक व्यापारी यांच्याकडून एम्फोटेरिसिन बी इंजेक्शन व पोसॅकोनाझोल १०० एमजी टॅबलेट खरेदी केलेल्या बिलाचे आरटीजीएसव्दारे बिलाची रक्कम

अर्थशिर्षक सन २०२१–२२

RE17F257

COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

या अर्थशिर्षकामधून रक्कम रूपये ४५ लाख पर्यंत किरकोळ व्यापारी /घाऊक व्यापारी यांना बिलाची रक्कम अदा करणे शक्य होईल.

वरील सर्व बाबींचे अवलोकन होउन खालील बाबी मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३२८ दि.१२/७/२०२१ चे पत्र.

१.किरकोळ व्यापारी /घाऊक व्यापारी यांचेकडून एम्फोटेरिसिन बी इंजेक्शन व पोसॅकोनाझोल १०० एमजी टॅबलेट महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम ६७(३)(क) अन्वये र.रू.४५ लाख पर्यंत खरेदी करून त्याप्रित्यर्थ होणा–या बिलाची रक्कम अदा करणेस

विषय क्रमांक :– ५१३ त्वर्य

प्रभाग क्र. ४ ड खराडी येथील स्मशानभूमी मधील अपूर्ण कामे पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सलिम मुसा संदे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५४,०१,३६१=५० पेक्षा २६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३९,९७,००७=५१ उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ६,४८,१६३=३८ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. १,०५,८१३=४४ अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये १०,१५०/– अधिक स्ट्रक्चरल इंजिनिअर फी र.रु. ५४,०१३=६२ अधिक थर्ड पार्टी कन्स्लटंसी चार्जेस र.रु. ७९,९४०=१५ पर्यंत अधिक निविदा अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/३२९ दि.७/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१४ त्वर्य

मा.पदाधिकारी यांचे कार्यालयात तसेच मा.स्थायी समिती व विशेष समिती सभा प्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ मागविणेत आले होते.त्याप्रित्यर्थ संबंधित बिलधारकाने बिले सादर केली होती. तरी संदर्भांकित ठराव क्र.२००४, दि.२३/०१/२०१८ अन्वये बिल अदा करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील शेड्युल डी चॅप्टर ५ मधील कलम २(२) कलम (१)(ब) नुसार करारनामा न करता नगरसचिव कार्यालयाकडील संबंधित अर्थशिर्षकावर बिले खर्ची टाकून संबंधितांस बिले अदा करणेस पश्चात मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/नगरसचिव/३३१ दि.१२/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१५ त्वर्य

रक्कम रू. ७० कोटीची गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/३३४ दि. १२/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१६ त्वर्य

रक्कम रू. ७० कोटीची गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/३३५ दि. १२/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१७ त्वर्य

रक्कम रू. ३० कोटीची गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/३३६ दि. १२/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१८ त्वर्य

रक्कम रू. ३० कोटीची गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/३३७ दि. १२/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५१९ त्वर्य

रक्कम रू. ३० कोटीची गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/३३८ दि. १२/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५२० त्वर्य

रक्कम रू. ७० कोटीची गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/३३९ दि. १२/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५२१ त्वर्य

सुरक्षिततेची उपाय योजना म्हणून कसबा विधानसभा मतदार संघामध्ये प्रायोगिक तत्वावर फरासखाना पोलिस स्टेशन मंडई पोलिस चौकी, सेनादत्त पोलिस चौकी इत्यादी अंतर्गत परिसरातील महत्वाच्या ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आय सिक्युअर पॉवर टेक्नॉलॉजीस इंडिया प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.८२,७८,६१८/– पेक्षा १% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८१,९५,८३१=८२ अधिक जी.एस.टी. १२% र.रुपये १४,७५,२४९=७३ असे एकूण र.रुपये ९६,७१,०८१=५५ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/३४० दि.१३/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५२२ त्वर्य

आरोग्यखाते किटकप्रतिबंधक विभागासाठी डासनाशक सायफ्ल्यूथ्रीन १०% डब्लू.पी या औषधाची बी-१ पद्धतीने खरेदी करणे कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदाधारकांपैकी सदर निविदेमध्ये प्रती किलोस रुपये ४८१८.०० सर्व करांसह असा लघुत्तम दर देणारे मे. लक्ष्मी केमिकल्स लाईम अँन्ड पेस्ट कंट्रोल,पुणे यांचेकडून प्रती किलो रुपये ४८१८/- सर्व करांसह या दराने एकूण १००० किलो औषधाची रक्कम रुपये **४८,१८,०००.००**(सर्व करांसह)(अक्षरी रक्कम रुपये अठ्ठेचाळीस लाख अठरा हजार ) पर्यंत खरेदी करण्यास त्यासाठी त्यांचेशी करारनामा करणेस त्यापोटी होणारे बिल सन-२०२१-२२ (RE17F114)५,जंतुनाशक विषारी औषधे.ख साथींचा बंदोबस्त या अर्थशीर्षकावर खर्ची टाकणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३४१ दि.१३/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५२३ त्वर्य

आरोग्यखाते किटकप्रतिबंधक विभागासाठी डासनाशक डायफ्ल्यूबेन्झूरॉन २५% डब्लू.पी या औषधाची बी-१ पद्धतीने खरेदी करणे कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ४ निविदाधारकांपैकी सदर निविदेमध्ये एकसमान लघुत्तम दर देणारे १.प्रोटेक्ट,मुंबई यांचेकडून प्रती किलोस र.रु ४७९७.५९ सर्व करांसह या दराने १००० किलो व २ एस.के.सेल्स,पुणे, यांचेकडून १००० किलो असे विभागून एकूण २००० किलो औषधाची एकूण रक्कम रुपये **९५,९५,१८०.००** सर्व करांसह (अक्षरी- रक्कम रु.पंच्यानो लाख पंच्यानो हजार एकशे ऐंशी)सर्व करांसह पर्यंत खरेदी करण्यास त्यासाठी त्यांचेशी करारनामा करणेस त्यापोटी होणारे बिल-सन.२०२१-२२ ( RE17F114) ५ जंतुनाशके विषारी औषधे,ख साथींचा बंदोबस्त या अर्थशीर्षकावर खर्ची टाकणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३४२ दि.१३/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५२४ त्वर्य

प्रभाग क्र. ३५ ड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रिडा संकुल मधील अंतर्गत विविध दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १० टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हेरंब कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,६८,३५२/– पेक्षा १५.५१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४१,९७,७६०=६० उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,९६,२०२=२४ अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये १४,४४५=७६ अधिक निविदा अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/३४३ दि.१३/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५२५ त्वर्य

जुने होळकर मध्ये आर.एम.यू. ब्रेकर नव्याने बसविणे व विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.फ्लोमॅक इंजिनिअरींग कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३९,९९,४१३=६० पेक्षा २.६००% कमी) असल्याने त्यांचेकडून जी.एस.टी.सह र.रु. ३८,९५,४२८=८४ पर्यंत काम करून घेणेस, त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/३४४ दि. १३/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– ५२६ त्वर्य

पुणे पेठ सदाशिव पेठ सि.स.नं.८०२, शनिपार येथील मनपा इमारतीच्या तळमजल्यावरील गाळा क्र.७ ही मिळकत ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र. ३ चे निविदाधारक श्री. सिद्धार्थ रणजित शहा, पत्ता १०८०, सदाशिव पेठ, शनिपार चौक, पुणे–४११०३० यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये४,७२,८७२/– (अक्षरी रक्कम रूपये चार लाख बहात्तर हजार आठशे बाहत्तर फक्त) ही मनपा निर्धारित वार्षिक रक्कम रूपये २,३७,६२४/–(अक्षरी रक्कम रूपये दोन लाख सदोतीस हजार सहाशे चोवीस फक्त)पेक्षा रक्कम रूपये २,३५,२४८/–(अक्षरी रक्कम रूपये दोन लाख पस्तीस हजार दोनशे अठ्ठेचाळीस फक्त) ने जास्त असल्याने त्यांच्याकडून ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१००९, दि. २२/०३/२०२१ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. २३ दि. ११/६/२०२१ विचारासाठी.

विषय क्रमांक :- ५२७ त्वर्य

पुणे पेठ सदाशिव पेठ सि.स.नं.८०२, शनिपार येथील मनपा इमारतीच्या तळमजल्यावरील गाळा क्र.८ ही मिळकत ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या पाच निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र. २ चे निविदाधारक श्री. हरिश्चंद्र नारायण निसाळ, पत्ता १०४५ अ, उमानाथ सोसा,सदाशिव पेठ, पुणे-४११०३० यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ४,७२,८७२/- (अक्षरी रक्कम रूपये चार लाख बहात्तर हजार आठशे बाहत्तर फक्त) ही मनपा निर्धारित वार्षिक रक्कम रूपये २,३७,६२४/-(अक्षरी रक्कम रूपये दोन लाख सदोतीस हजार सहाशे चोवीस फक्त)पेक्षा रक्कम रूपये २,३५,२४८/-(अक्षरी रक्कम रूपये दोन लाख पस्तीस हजार दोनशे अठ्ठेचाळीस फक्त) ने जास्त असल्याने त्यांच्याकडून ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१०११, दि. २२/०३/२०२१ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. २४ दि. ११/६/२०२१ विचारासाठी.

विषय क्रमांक :- ५२८ त्वर्य

पुणे पेठ शनिवार सि.स.नं.४६७(ब) न वि. गाडगीळ शाळेच्या आवारामधील जलतरण तलाव ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या दोन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र. १ चे निविदाधारक श्री. विराज इंटरप्रायजेस, पत्ता १३०,दांडेकर पूल, पुणे यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेले मासिक भाडे रक्कम रूपये ४१,१११/- (अक्षरी रक्कम रूपये एक्केचाळीस हजार एकशे अकरा फक्त) ही मनपा निर्धारित मासिक भाडे रक्कमेपेक्षा रक्कम रूपये २६,२६१/-(अक्षरी रक्कम रूपये सव्वीस हजार दोनशे एकसष्ठ फक्त) ने जास्त असल्याने त्यांच्याकडून ताबा दिनांकापासून ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्विकारणेस तसेच त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रीडा विभाग/१०४५, दि. २४/०३/२०२१ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. २५ दि. ११/६/२०२१ विचारासाठी.

विषय क्रमांक :- ५२९ त्वर्य

पुणे पेठ शिवाजीनगर येथील स.नं.१००/१०१, कुसाळकर पुतळ्यासमोरील व्यावसायिक इमारतीमधील गाळा क्र.५ ही मिळकत ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या दोन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र. १ चे निविदाधारक श्री. सुनील गिरीधारीलाल गोयल, पत्ता प्लॉट नं.सुवर्ण युग सोसा,अ-३६ ५ वा मजला नागरस रोड,मेडी पॉईंट शेजारी,औंध,पुणे-४११००७ यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रूपये १०,१००/- (अक्षरी रक्कम रूपये दहा हजार शंभर फक्त) ही मनपा निर्धारित मासिक रक्कम रूपये ९४४५/-(अक्षरी रक्कम रूपये नऊ हजार चारशे पंच्चेचाळीस फक्त)पेक्षा रक्कम रूपये ६५५/-(अक्षरी रक्कम रूपये सहाशे पंच्चावण्ण फक्त) ने जास्त असल्याने त्यांच्याकडून ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माल व्यव./१०९, दि.२०/०५/२०२१ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३४(१) दि. ११/६/२०२१ विचारासाठी.

विषय क्रमांक :- ५३० त्वर्य

पुणे सदाशिव पेठ येथील सि.स.नं.८०२, शनिपार येथील मनपा इमारतीच्या तळमजल्यावरील गाळा क्र.३ ही मिळकत ३ वर्षे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या दोन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र. १ चे निविदाधारक श्री. देवव्रत सुभाष हंबीर, पत्ता त्रिशुंड गणपती मंदिराजवळ,८७,सोमवार पेठ,सादकुंज बिल्डिंग,प्लॉट नं.७, पुणे-४११०११ यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ६,३०,६७२/- (अक्षरी रक्कम रूपये सहा लाख तीस हजार सहाशे बाहत्तर फक्त) ही मनपा निर्धारित वार्षिक रक्कम रूपये २,३७,६२४/-(अक्षरी रक्कम रूपये दोन लाख सदोतीस हजार सहाशे चोवीस फक्त)पेक्षा रक्कम रूपये ३,९३,०४८/-(अक्षरी रक्कम रूपये तीन लाख त्र्याण्णव हजार अठ्ठेचाळीस फक्त) ने जास्त असल्याने त्यांच्याकडून ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माल व्यव./११०, दि.२०/०५/२०२१ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३५(१) दि. ११/६/२०२१ विचारासाठी.

विषय क्रमांक :- ५३१ त्वर्य

कर्वे रोड लगत एरंडवणा क्षेत्रात पुणे मनपाचे तसेच खाजगी मालकीचे एकही वाहनतळ नाही. तसेच एस.एन.डी.टी. कॉलेज,गरवारे कॉलेज, सह्याद्री हॉस्पिटल यासारखी वर्दळीची ठिकाणे असल्याने पार्किंगची मोठी गैरसोय होत आहे. महामेट्रोने पुणे मनपास सादर केलेला पार्किंग नकाशा हा खुल्या जागेत फक्त दुचाकीसाठी आहे. तेथे कोणतेही बांधकाम होणार नाही. परंतू जर विषयांकित ठिकाणी महामेट्रो तर्फे बहुमजली पार्किंग इमारत विकसित केली तर मेट्रो रेलचा उपभोग घेणारे व इतर सर्वसामान्य नागरीक यांनाही भविष्यकाळात त्याचा फायदा होऊ शकेल. त्यामुळे सदर ठिकाणी बहुमजली पार्किंग इमारत विकसित करणे योग्य होईल असे खात्याचे मत आहे.

तरी वरील बाबींचे अवलोकन होऊन खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१४८, दि. २७/०५/२०२१ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३८ दि. ११/६/२०२१ विचारासाठी.

१. पुणे मेट्रो रेल प्रकल्पाचे गरवारे कॉलेज मेट्रो स्टेशनच्या पार्किंगसाठी पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट नं.२५+२५अ येथील ६१८.२७ चौ.मी. खुली जागा ३० वर्ष कालावधीकरीता महामेट्रोस हस्तांतरीत करणेस.
२. सदर जागेचे सन २०२०-२१ नुसार होणारे र.रू. ४,५७,०८,७०१/-(चार कोटी सत्तावण्ण लक्ष आठ हजार सातशे एक फक्त) पुणे महापालिकेचे मेट्रो प्रकल्पामध्ये असणा-या या आर्थिक दायीत्वामधून वळते करून घेऊन स्वामीत्वापोटी दरवर्षी रक्क्म रू.१/- इतकी आकरणी करणेस.
३. मिळकत वाटप नियमावली मधील तरतूदींना अधीन राहून सदर भाडेकरार नुतनीकरण करणेस.

विषय क्रमांक :- ५३२ त्वर्य

पुणे पेठ कात्रज स.नं.७४ येथील कै.हनुमंतराव तुकाराम थोरवे शाळा क्र.१६२ वी चंद्रभागा नगर कात्रज पुणे ४६ या शाळेचे कै.बाळासाहेब ठाकरे क्रींडागण मैदान अव्यावसायिक कारणाकरिता नोंदणीकृत धर्मादाय संस्था / नोंदणीकृत सामाजिक संस्था यांना सायंकाळी ६ ते ८ फक्त या वेळेत ३ वर्ष कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या दोन निविदाधारकांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे क्र. १ चे निविदाधारक मे.क्रिस्टल स्पोटर्स असोसिएशन तर्फे प्रोपा.सौ.विमल दिलीप जगताप, पत्ता मित्र छाया निवास,भैरवनाथ मंदिर जवळ,कात्रज,पुणे-४११०४६ यांची निविदा आली असून त्यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ६६,०००/-(अक्षरी रक्कम रूपये सहासष्ट हजार फक्त) ही मनपा निर्धारित वार्षिक रक्कम रूपये ६०,०००/-(अक्षरी रक्कम रूपये साठ हजार फक्त)पेक्षा रक्कम रूपये ६,०००/-(अक्षरी रक्कम रूपये सहा हजार फक्त) ने जास्त असल्याने त्यांच्याकडून ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतूदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१५०, दि. २७/०५/२०२१ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३९ दि. ११/६/२०२१ विचारासाठी.

विषय क्रमांक :- ५३३ त्वर्य

मा.राहूल भंडारे व मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि.१३/७/२०२१ चे पत्र.

स्वराज्य स्वयंरोजगार सहकारी संस्था मर्यादित, यशराज ॲव्हेन्यू सोसायटी, भेकराईनगर, फुरसुंगी, पुणे सहकार तत्वावर चालविण्यात येणाऱ्या रजिस्टर्ड संस्था असून या संस्थामधून अनेक गोरगरीब महिला व गरजू लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

तरी वरील संस्थेस शासन निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन क्षेत्रिय कार्यालयास र.रू. ३ लाखापर्यत लागणाऱ्या सेवा व वस्तु घेण्यासाठी काम विना निविदा काढण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :- ५३४ त्वर्य

मा.सौ.सुनिता वाडेकर, उपमहापौर यांचे दि.९/७/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. ८ अ मधील पुणे-मुंबई रस्ता हॅरिस ब्रीज ते खडकी कॅन्टोंनमेंट या ९०० मीटर लांबीच्या रस्त्याचे भुसंपादनासाठी र.रू. ४०,४६,४३५८६/- चे वर्गीकरण करण्यात यावे.

विषय क्रमांक :- ५३५ त्वर्य

वसंतराव बागुल उद्यानातील म्युझिकल फाऊंटनमध्ये मल्टीमिडीया वॉटर स्क्रीन शोद्वारे १९७१ भारताची शौर्थगाथा हा बांग्लादेश युध्दावर आधारित देखावा उभा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरेश्वर इलेक्ट्रीकल कॉर्पोरेशन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.२,८९,१३,१९१/- पेक्षा १% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,८६,२४,०५९=०९ जी.एस.टी. सह पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/३१६ दि.६/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- ५३६ त्वर्य

मुख्य कॅनॉलवरील पुल व मुख्य कॅनॉल ते मिरज रेल्वे लाईनपर्यंत रस्त्याचे काम करणेकरीता 'सोलापुर मुख्य रस्ता हडपसर स.नं. ८५ ते हडपसर स.नं. ७९ स.नं. ८० मुख्य रस्ता रेल्वे लाईन पर्यंत ३० मी. रस्ता विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे' अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम १९४९ चे कलम ७२ ब नुसार र.रु. १७.१६ कोटी खर्चाचे उत्तरदायित्व स्विकारण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/३४५ दि.१३/७/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- ५३७ त्वर्य

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमधील स्ट्रीट लाईट, कार्यालय, शाळा इत्यादीचे थकीत वीज बिले महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, पुणे यांना अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/३४६ दि. १३/७/२०२१

१) पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमधील स्ट्रीट लाईट, कार्यालय, शाळा इत्यादीचे थकीत वीज बिल र.रुपये ४,२७,२८,६१२/- व यापुढील कालावधीतील वीज बिले महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, पुणे यांना अदा करणेस
२) अ.क्र. १ मधील वीज बिलापोटीची रक्कम सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकीय वरील अर्थशिर्षकावर (बजेट कोड RE20C103) खर्च करणेस
3) पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट २३ गावांमधील अदा केलेली थकीत वीज बिलाची रक्कम पुढील कालावधीत १५ वा वित्त आयोग शासनाच्या अनुदानातुन पुणे महानगरपालिकेकडे समायोजित करणेस

विषय क्रमांक :- ५३८ त्वर्य

मा.सौ.मनिषा लडकत व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि.१३/७/२०२१ चे पत्र.

५४/४ HP लोहियानगर, गंज पेठ येथे दि.२३/११/२० रोजी अचानक आग लागली होती व त्यात ९ झोपड्या पूर्णपणे जळालेल्या होत्या. ह्या ९ घरांना मदत म्हणून आर्थिक सहाय्य देण्यास स्थायी समितीची व मुख्य सभेची मान्यता देण्यात आलेली आहे.

- मा.स्थायी समिती ठराव क्र. १४८७ दि.१६/०३/२०२१ सभा क्र.७६
- महानगरपालिका सभा ठराव क्र.४६६ दि.१८/०३/२०२१ सभा क्र.१२४

मनपा अंदाजपत्रक २०२१-२०२२ थ.आपत्ती व्यवस्थापन विभाग थ१. नैसर्गिक आपत्तीग्रस्त / अपघातग्रस्थांना तातडीने मदत

बजेट कोड RE11R101, तरतूद रू.१,००,००,०००/- तरतुद उपलब्ध आहे.

तरी जळीत ग्रस्ताना मदत देणे कामी खालील बाबीस मान्यता द्यावी.

५४/४ HP लोहियानगर, गंज पेठ येथील एकूण ९ पूर्णत: बाधितांना प्रत्येकी रू.११०००/- प्रमाणे रू.९९०००/- कुटुंबासाठी घरगुती व दैनंदिन साहित्य खरेदी करावयाचे किंवा अर्थसहाय्य देण्याचे झाल्यास सुमारे घरगुती भाडी व वस्तूचे नुकसान व कपड्याचे नुकसान पडझड / नष्ट झालेल्या झोपड्या / घरे पूर्णत: जळुन गेलेली या करिता घरगुती वस्तू दैनंदिन वापराचे साहित्य / वस्तू करिता अर्थसहाय्य घरगुती व दैनंदिन वापराचे साहित्य जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे,गृहशाखा यांचेकडून प्राप्त होणा-या यादी नुसार बाधित कुटुंब निश्चित करणे व त्यानुसार साहित्य / अर्थसहाय्य वाटप करणेस.

याकरिता लोहियानगर पुणे, गृहशाखा यांचेकडून प्राप्त यादी नुसार बाधित कुटुंब निश्चित करणे व त्यानुसार अर्थसहाय्य वाटप करणे. उपरोक्त प्रमाणे बाधित कुटुंबाना अर्थसहाय्य द्यावयाचे झाल्यास डिबिटी पद्धतीने संबधितांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यास.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.